महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व ताण यांचा चिकित्सक अभ्यास

महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छ. संभाजीनगर येथे विद्यावाचस्पती
(पीएच.डी. शिक्षणशास्त्र) पदवीकरिता सादर करावयाचा
संशोधन प्रबंध सारांश

संशोधक
नूतन भगवान मघाडे

संशोधन मार्गदर्शक
डॉ. अमरदीप पी. आसोलकर
सहाय्यक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छ. संभाजीनगर

संशोधन केंद्र
महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छ. संभाजीनगर

सप्टेंबर 2024

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृ. क्र.
1	संशोधनाचे शीर्षक	1
2	प्रास्ताविक	1
3	संशोधनाची गरज	2
4	संशोधनाचे महत्व	3
5	संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या	4
6	संशोधनाची गृहितके	4
7	संशोधनाची उद्दिष्टे	4
8	संशोधन प्रश्न	5
9	संशोधनाची परिकल्पना	5
10	संशोधनाची व्याप्ती	6
11	संशोधनाची मर्यादा	6
12	संबंधित संशोधन साहित्याचा आढावा	6
13	संशोधन पद्धती	7
14	संशोधनाची जनसंख्या	7
15	नमुना निवड	7
16	माहिती संकलनाची साधने	7
17	माहिती विश्लेषणासाठी वापरलेली परिमाणे	8
18	माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन	8
19	संशोधनाचे उद्दिष्टनिहाय निष्कर्ष	9
20	संशोधनाचे परिकल्पना पडताळणी आधारित निष्कर्ष	12
21	संशोधनाचे मुख्य निष्कर्ष	14
22	संशोधन निष्कर्षांची चर्चा	16
23	संशोधनाच्या शिफारशी	17
24	पुढील संशोधनासाठी विषय	17
25	समारोप	18
26	संदर्भ सूची	18

1. संशोधनाचे शीर्षक

महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व ताण यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

2. प्रास्ताविक

शासन महिला सबलीकरणासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहे. विशेषत्वाने शिक्षणाची गंगा देशाच्या काना-कोपऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे उद्दिष्ट स्त्रियांना शिक्षण प्रवाहात आणणे होते. भौगोलिक आणि आर्थिक समस्येमुळे मुलींचे शिक्षण थांबता कामा नये यासाठी अनेक योजना शासन सतत राबवीत असते. या योजनांमध्ये प्रामुख्याने सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अशा योजना राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मुलींच्या शिक्षणाची प्राथमिकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने प्राथमिक स्तरावरील मुलींच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (NPEGEL) या नावाने अत्यंत मूलगामी परिणाम घडवून आणण्यास सक्षम असणारा कार्यक्रम सुरू केलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत प्राथमिक शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शिक्षण अर्धवट सोडून शाळाबाह्य झालेल्या मुलींसाठी त्यांचे किमान आठवी पर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना सुरू करण्यात आली आहे.

भारत सरकारने ऑगस्ट 2004 मध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV) योजनेला परवानगी दिलेली आहे. सन 2001 च्या जनगणने आधारे ज्या तालुक्यात स्त्री साक्षरतेचे प्रमाण (41.13%) राष्ट्रीय स्त्री साक्षरतेच्या सरासरी प्रमाणाच्या कमी आहे, ज्या तालुक्यात स्त्री पुरुष साक्षरतेचा फरक (21.59%) हा राष्ट्रीय साक्षरतेच्या सरासरीपेक्षा जास्त आहे अशा शैक्षणिक दृष्ट्या मागास तालुक्याना NPEGEL योजना लागू आहे. त्याच तालुक्याना देखील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना लागू आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी सन 2004 मध्ये एकूण 27 आणि 2006 मध्ये 9 अशी एकूण 36 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मंजूर केलेले आहे. या 36 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांपैकी 16 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये खाजगी संस्थांना चालविण्यासाठी देण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता सन 2010-11 मध्ये नव्याने 7 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाना परवानगी दिलेली आहे. त्यामुळे 2011-12 पर्यंत राज्यात 29 शासकीय व 14 खाजगी संस्था मार्फत अशी एकूण 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये सुरू आहेत.

शाळेचे कामकाज पूर्ण क्षमतेने करण्यासाठी सर्वच प्रकारचा कर्मचारी वर्ग लागतो. जर शाळेत कामाच्या कार्याभारानुसार शिक्षक आणि कर्मचारी वर्ग नसेल तर त्या अतिरिक्त कामाचा बोजा इतर शिक्षक आणि कर्मचारी यांच्यावर पडत असतो. यामुळे जसे काम वाढत जाते तसे काम करण्याच्या क्षमतेवर आणि ते काम गुणवत्तापूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या कौशल्यावर नकारात्मक परिणाम होत जातो. याचा अनेक अंगांनी परिणाम होतो. विशेष करून कामाचा अनावश्यक अतिरिक्त बोजा वाढत गेला की कामातील निष्ठा कमी होत जाते, मानसिक दबाव वाढत जातो, कामात मन लागत नाही, कामात स्वारस्य नसल्यामुळे कामही चांगल्या पद्धतीने होत नाही, विशेष करून ताण वाढत जातो आणि यामुळे कार्यात कोणतेही समाधान राहत नाही. अर्थातच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात ताण-तणाव वाढत जातो आणि कार्यसमाधान राहत नाही.

वरील प्रमाणे विविध दृष्टीकोनातून विचार करता संशोधकाने महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व ताण यांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधनकार्य केले आहे.

3. संशोधनाची गरज

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय हे मुलींच्या शिक्षणासाठी अत्यंत महत्वाचे मानले जाते. या विद्यालयात शिकविणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी करार तत्वावर कार्य करत असतात. यामुळे प्रस्तुत संशोधनात या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व्यावसायिक दृष्ट्या स्थिर नसतात. यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर होत असतो. यातून मानसिक दडपण निर्माण झाल्यामुळे ताण-तणाव वाढत जातो असतो. स्वाभाविकपणे याचा परिणाम त्यांच्या व्यावसायिक जीवनावर होत असतो. या दृष्टीकोनातून संशोधनात्मक अभ्यास गरजेचा आहे.
3. शिक्षकाला व्यवसाय समाधान आणि तणावमुक्त जीवनशैली प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यासाठी संशोधनात्मक अभ्यास आवश्यक आहे.
4. स्त्री सक्षमीकरण हे शासनाचे अनेक वर्षापासुनचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी अनेक सामाजिक आणि शैक्षणिक योजना राबविल्या जात आहेत. यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय एक योजना आहे. या शाळातील शिक्षक आणि इतर कर्मचारी मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी किती तत्पर आणि समर्पित आहेत याचा अभ्यास आवश्यक आहे.

5. अलिकडच्या काळात अनेक शैक्षणिक समस्यामुळे तसेच विविध कारणांमुळे शिक्षक तणावात येत आहेत. नकारात्मक वृत्ती वाढत आहे. शिक्षकी व्यवसायावरचा विश्वास ढासळत चालला आहे. यातून निर्माण होणारी असहायता व निष्क्रीयता चिंताजनक आहे. यातून शिक्षकाला बाहेर काढण्यासाठी आणि योग्य दिशा प्रदान करण्यासाठी संशोधनात्मक अभ्यास गरजेचा आहे.
6. सेवा सातत्याचा, कामकाज स्वरूपाचा, आर्थिक गोष्टीचा परिणाम स्त्री आणि पुरुष कर्मचारी यांच्या व्यवसाय समाधान व ताण यावर कसा होतो हे अभ्यास करणे गरजेचे आहे.

4. संशोधनाचे महत्व

1. प्रस्तुत संशोधनातून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या व्यवसाय समाधान आणि ताण-तणाव यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये व्यवसाय समाधानाची पातळी समजण्यास मदत होणार आहे. यामुळे शिक्षक आणि इतर कर्मचारी यांच्या व्यवसाय समाधानासाठी अधिकच्या उपाययोजना करण्यासाठी वाव मिळेल.
2. प्रस्तुत संशोधनातून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यवसाय समाधानाची पातळी समजण्यास मदत होणार आहे आहे. यामुळे त्यांच्या व्यवसाय समाधानासाठी अधिकच्या उपाययोजना करण्यासाठी वाव मिळेल.
3. प्रस्तुत संशोधनातून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांच्या ताण-तणावाचा अभ्यास होणार आहे. यामुळे त्यांच्या ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिकच्या उपाययोजना करण्यासाठी योग्य दिशा मिळेल.
4. प्रस्तुत संशोधनातून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या ताण-तणावाचा अभ्यास होणार आहे. यामुळे त्यांच्या ताण-तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिकच्या उपाययोजना करण्यासाठी योग्य दिशा मिळेल.
5. प्रस्तुत संशोधनातून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या तणावाचा आणि व्यवसाय समाधानाचा अभ्यास होणार आहे. यामुळे शालेय आणि शासकीय स्तरावर या विद्यालयांच्या गुणवत्ता सुधारासाठी मार्गदर्शन मिळणार आहे.
6. कस्तुरबा गांधी बालिका विदयालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व ताण या विषयावर अद्याप देश व राज्य पातळीवर संशोधन झालेले नाही हा विषय संशोधनासाठी नवीन असल्यामुळे संशोधकाने अभ्यासा करिता निवडला आहे.

5. संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय: प्राथमिक शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिलेल्या तसेच शिक्षण अर्धवट सोडून शाळाबाह्य झालेल्या मुलींसाठी त्यांचे किमान आठवी पर्यंत शिक्षण पूर्ण करण्यासाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही योजना भारत सरकारने ऑगस्ट 2004 मध्ये सुरू केली आहे. महाराष्ट्रात एकूण 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये सुरू आहेत.

2. कर्मचारी: महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी होय.

3. कार्यसमाधान: महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे कार्यसमाधान होय.

4. ताण: महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावरील कामासंबंधित येणारा ताण होय.

6. संशोधनाची गृहितके

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय ही निवासी शिक्षण योजना शासनाने मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सुरु केलेली योजना आहे.
2. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात कार्यसमाधानाचे प्रमाण कमी जास्त असते.
3. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात ताणाचे प्रमाण कमी जास्त असते.
4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांमधील कार्यसमाधान आणि ताण यांचे प्रमाण कमी जास्त दिसून येते.
5. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांमधील कार्यसमाधान आणि ताण यांचे प्रमाण कमी जास्त दिसून येते.
6. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये कार्यसमाधान आणि ताण यांचे प्रमाण कमी जास्त दिसून येते.

7. संशोधनाची उद्दिष्टे

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
5. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व ताण यातील सहसंबंध अभ्यासणे.

8. संशोधन प्रश्न

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांमध्ये कार्यसमाधान आहे का?
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये कार्यसमाधान आहे का?
3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या व्यावसायिक ताणात काही फरक आहे का?
4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या व्यावसायिक ताणात काही फरक आहे का?
5. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान आणि व्यावसायिक ताण यांच्यात काही सहसंबंध दिसून येतो का?

9. संशोधनाची परिकल्पना

संशोधन परिकल्पना

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो.
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो.
3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून येतो.
4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून येतो.
5. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यात सहसंबंध आढळून येतो.

शून्य परिकल्पना

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानात कोणताही फरक आढळून येत नाही.
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात कोणताही फरक आढळून येत नाही.

3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या व्यावसायिक ताणात कोणताही फरक आढळून येत नाही.
4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताणात कोणताही फरक आढळून येत नाही.
5. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यात सहसंबंध आढळून येत नाही.

10. संशोधनाची व्याप्ती

क्षेत्र व्याप्ती: सदर संशोधन हे महाराष्ट्रातील 10 जिल्ह्यातील 43 तालुक्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांशी संबंधित आहे.

आशय व्याप्ती: सदर संशोधन कार्य हे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कार्यसमाधान आणि ताण यांच्याशी संबंधित आहे.

घटक व्याप्ती: सदर संशोधन कार्य हे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संबंधित आहे.

11. संशोधनाची मर्यादा

क्षेत्र मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील 10 जिल्ह्यातील 43 तालुक्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांपुरताच मर्यादित आहे.

आशय मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कार्यसमाधान आणि ताण या दोन घटकांच्या अभ्यासापुरताच मर्यादित आहे.

घटक मर्यादा: प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यापुरताच मर्यादीत आहेत.

काल मर्यादा: प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2021-2024 या कालावधीपुरतेच मर्यादित आहे.

12. संबंधित संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधनामध्ये संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेण्यासाठी पूर्वी झालेल्या संशोधनांचा आणि नियतकालिकातील संशोधन लेखांचा आढावा घेण्यात आला आहे. विविध स्त्रोतांच्या माध्यमाने संशोधकाने संशोधनाशी संबंधित 37 संशोधन प्रबंध आणि नियतकालिकातील 20 संशोधन लेखांचा आढावा घेतलेला आहे.

13. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला आहे. प्रस्तुत संशोधनकार्याचा मुख्य उद्देश हा महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व ताण यांचा चिकित्सक अभ्यास करणे आहे. त्या अनुषंगाने उद्दिष्टे मांडण्यात आली आहेत. यामध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान अभ्यासणे, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांमधील ताण अभ्यासणे, आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यातील कार्यसमाधान व ताण यातील परस्पर संबंध अभ्यासणे. अशी उद्दिष्टे समोर ठेऊन संशोधनकार्य पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये पूर्णपणे सर्वेक्षण पद्धतीने वर्तमान स्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. याच दृष्टीकोनातून संशोधनाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पध्दती वापरण्यात आली आहे.

14. संशोधनाची जनसंख्या

प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधान आणि ताणाचा तुलनात्मक अभ्यास करणारे आहे. महाराष्ट्रात एकूण 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये आहेत. या सर्व विद्यालयात एकूण 645 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. हे सर्वच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संशोधनाची जनसंख्या आहेत.

15. नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने नमुना निवडीच्या संभाव्यता पद्धतीच्या आधारावर महाराष्ट्रातील सर्वच 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांची निवड अभ्यासासाठी केली आहे. या सर्व विद्यालयात एकूण 565 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी संशोधकाने प्रासंगिक नमुना निवड पद्धतीने 425 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रतिसादक म्हणून निवड केली होती. यामध्ये एकूण 47 पुरुष शिक्षक, 164 महिला शिक्षक, 107 पुरुष शिक्षकेतर कर्मचारी आणि 107 महिला शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड करण्यात आली होती. यामध्ये संशोधकाने संशोधन अभ्यासासाठी अभ्यास क्षेत्रातील उपलब्ध जनसंख्येतील 80% नमुना निवड केली आहे.

प्रतिसादक	जनसंख्या (कार्यरत)	नमुना निवड	नमुना टक्केवारी
पुरुष शिक्षक	47	47	100%
महिला शिक्षक	164	164	100%
पुरुष शिक्षकेतर कर्मचारी	107	107	100%
महिला शिक्षकेतर कर्मचारी	178	107	60%

16. माहिती संकलनाची साधने

प्रस्तुत संशोधनात नमुना म्हणून निवडलेल्या महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील 425 शिक्षक आणि शिक्षेतर कर्मचारी यांच्याकडून कार्यसमाधान मापनश्रेणी आणि व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणी सुनियोजित कालावधीत भरुन घेण्यात आल्या. सदर वर्गीकृत माहितीचे संख्यात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. सदर माहितीचे वर्गीकरण कोष्टके आणि आलेख यांच्या माध्यमाने करण्यात आले आहे. तसेच माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन सहसंबंध गुणक या संख्याशास्त्रीय तंत्र वापरून करण्यात आले आहे. एकंदरीत सदर संशोधनासाठी माहिती संकलनासाठी डॉ. अमर सिंह व डॉ. टी. आर. शर्मा यांची कार्यसमाधान मापनश्रेणी आणि डॉ. ए. के. श्रीवास्तव व डॉ. ए. पी. सिंह यांची व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणी या दोन प्रमाणित चाचण्या वापरण्यात आल्या आहेत.

17. माहिती विश्लेषणासाठी वापरलेली परिमाणे

1. **कोष्टकीरकरण -** महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिलेल्या प्रतिसादावरून कोष्टके तयार केली. यामुळे अन्वयार्थ व निष्कर्ष काढणे आणि समजणे सोपे झाले आहे.
2. **आलेख -** महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिलेल्या प्रतिसादावरून निष्कर्ष वस्तुनिष्ठ होण्यासाठी संशोधकाने विविध आलेख काढले आहेत.
3. **संख्याशास्त्रीय तंत्रे -** महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रमाणित चाचणीला दिलेल्या प्रतिसादाचे संख्यात्मक विश्लेषण करण्यासाठी माध्यमान, प्रमाण विचलन, टी परीक्षिका आणि सहसंबंध गुणक (r) ही संखाशास्त्रीय तंत्रे वापरण्यात आली आहेत.

18. माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी संशोधकाने संशोधन विषयाची पार्श्वभूमी, स्वरुप, उद्दिष्टे आणि परिकल्पना यांना अनुसरुन सर्वेक्षण संशोधन पद्धतीची निवड केली आहे. यामध्ये माहिती संकलनासाठी डॉ. अमर सिंह व डॉ. टी. आर. शर्मा यांची कार्यसमाधान मापनश्रेणी व डॉ. ए. के. श्रीवास्तव व डॉ. ए. पी. सिंह यांची व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणी या दोन प्रमाणित चाचण्यांचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधन समस्येचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील 43 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांची निवड केली. त्या विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधान आणि ताण यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी 425 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचाकडून प्रमाणित चाचणीच्या माध्यमाने माहिती संकलित केली. त्या प्रमाणित चाचणीला आलेल्या प्रतिसादाचे व्यवस्थितरित्या संकलन व वर्गीकरण करण्यात आले. सदर माहितीचे संख्याशास्त्रीय तंत्रे वापरून विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

19. संशोधनाचे उद्दिष्टनिहाय निष्कर्ष

संशोधनामध्ये संकलित माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केल्यानंतर जे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत त्यांची उद्दिष्टनिहाय मांडणी येथे करण्यात आली आहे.

उद्दिष्ट क्र. 1 - कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यांच्या कार्यसमाधानात फरक दिसून आला.
2. महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यशैलीमध्ये अंतर असते. त्यांचे व्यावसायिक, सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदारी आणि कर्तव्ये यातही फरक असतो. याचा परिणाम त्यांच्या कार्यसमाधानावर होणे स्वाभाविक आहे.
3. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यसमाधान मापनश्रेणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता महिला शिक्षकांचे प्रतिसाद मध्यमान 111.21 व पुरुष शिक्षकांचे प्रतिसाद मध्यमान 105.91 आहे. तसेच महिला शिक्षक प्रतिसाद प्रमाण विचलन 8.15 व पुरुष शिक्षक प्रतिसाद प्रमाण विचलन 11.71 आहे. त्याचबरोबर प्राप्त 't' मूल्य 2.91 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.

उद्दिष्ट क्र. 2 - कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानाचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यांच्या कार्यसमाधानात फरक दिसून आला आहे.
2. महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्य करण्याच्या पद्धतीमध्ये अंतर असते. महिला आणि पुरुष यांची कामे कौशल्यानुसार वाटली गेलेली असतात. जी कामे महिला करतात ती कामे पुरुष करत नाहीत आणि जि कामे परुष करतात ती कामे महिला करत नाहीत. मेहनतीची कामे जास्ती करून पुरुषांना दिली जातात तर महिलांना कौशल्याची कामे दिली जातात. याचा परिणाम परिणाम त्यांच्या कार्यसमाधानावर होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधानात फरक आहे.
3. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान मापनश्रेणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद मध्यमान 99.21 व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद मध्यमान 108.64 आहे. तसेच महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद प्रमाण विचलन 8.83 व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद प्रमाण विचलन 6.73 आहे. त्याचबरोबर प्राप्त 't' मूल्य 8.79 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.

उद्दिष्ट क्र. 3 - कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यांच्या ताणात फरक दिसून आला आहे.
2. महिला शिक्षकांवर नोकरी आणि कुटुंब अशी दुहेरी जबाबदारी असते. यामुळे त्यांना दोन्ही बाबतीत संतुलन ठेवावे लागत असते. अर्थातच यामुळे ते शारीरिक आणि मानसिक स्तरावर लवकर थकतात. यामुळे त्यांच्यावर ताण येतो. त्याचबरोबर पुरुष शिक्षकांवर सामाजिक जबाबदारी जास्त असते. ते आर्थिक स्त्रोतावर अधिक केंद्रित असतात. मात्र महिला शिक्षकांपेक्षा त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदारीचे प्रमाण कमी

असते. यामुळे महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात फरक निर्माण होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात फरक आहे.

3. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता महिला शिक्षकांचे प्रतिसाद मध्यमान 177.68 व पुरुष शिक्षकांचे प्रतिसाद मध्यमान 158.43 आहे. तसेच महिला शिक्षक प्रतिसाद प्रमाण विचलन 12.44 व पुरुष शिक्षक प्रतिसाद प्रमाण विचलन 14.22 आहे. त्याचबरोबर प्राप्त 't' मूल्य 8.40 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.

उद्दिष्ट क्र. 4 - कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील ताणाचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यांच्या ताणात फरक दिसून आला आहे.
2. महिला शिक्षकेतर कर्मचारी शालेय स्तरावर विविध प्रकारची कामे करतात. तसेच कौटुंबिक जबाबदारी सांभाळतात. तसेच नोकरी स्थायी नसल्यामुळे सतत नोकरी टिकविण्याची चिंता असते. यामुळे त्यांच्यावर अधिक ताण निर्माण होतो. पुरुष शिक्षकेतर कर्मचारी हे शाळेतील कामे करतात मात्र इतर घरातील कामे करण्याची गरज नसते. घरातील महिला ती कामे करून घेतात. यामुळे त्यांना थोडा वेळ मिळतो. मात्र महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसाही वेळ मिळत नाही. त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणे स्वाभाविक आहे. यामुळे महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात तफावत निर्माण होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात फरक आहे.
3. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद मध्यमान 172.71 व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद मध्यमान 155.83 आहे. तसेच महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद प्रमाण विचलन 12.27 व पुरुष शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांचे प्रतिसाद प्रमाण विचलन 8.91 आहे. त्याचबरोबर प्राप्त 't' मूल्य 11.51 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.

उद्दिष्ट क्र. 5 - कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व ताण यातील सहसंबंध अभ्यासणे.

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कार्यसमाधान आणि ताण यात धनात्मक सहसंबंध आहे. कर्मचाऱ्यांना जर व्यावसायिक ताण कमी असेल तर त्यांचे कार्यसमाधान वाढते. कर्मचारी मानसिक दृष्ट्या संतुलित आणि सक्षम असतील तर ते अधिक चांगल्या पद्धतीने आणि समर्पित वृत्तीने कार्य करतात.
2. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणावरून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यातील सहसंबंध गुणांक 0.84 आहे. याचाच अर्थ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यांच्यामध्ये उच्च प्रतीचा धनात्मक सहसंबंध दिसून येतो.

20. संशोधनाचे परिकल्पना पडताळणी आधारित निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनात एकूण पाच शून्य परिकल्पना मांडण्यात आल्या होत्या. सदर परिकल्पनांची सांख्यिकीय परिमाणांच्या आधारे पडताळणी केल्यानंतर पुढील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

1. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे प्राप्त टी-मूल्य (t – Value) 14.30 आहे. हे गुणोत्तर 0.01 सार्थकता स्तरावरील प्रमाण टी मूल्यापेक्षा (2.58) जास्त आहे. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पना स्विकारण्यात आली आहे. याचाच अर्थ, 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानात कोणताही फरक आढळून येत नाही' या शून्य परीकाल्पनेचा त्याग करून 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो' या संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. सदर फरक हा खरा व वैध असून तो विश्वसनीय आहे. यावरून संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो. असा संशोधन अभ्यासाअंती निष्कर्ष निघतो.

2. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे प्राप्त टी मूल्य 8.79 हे 212 स्वाधीनता

मात्रेवर 0.05 स्तरावर सार्थक आहे. त्यामुळे शून्य परिकल्पना त्याज्य ठरते. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पना स्विकारण्यात आली आहे. याचाच अर्थ, 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात कोणताही फरक आढळून येत नाही' या शून्य परीकाल्पनेचा त्याग करून 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो' या संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. सदर फरक हा खरा व वैध असून तो विश्वसनीय आहे. यावरून संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक आढळून येतो. असा संशोधन अभ्यासाअंती निष्कर्ष निघतो.

3. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे प्राप्त टी मूल्य 8.40 हे 209 स्वाधीनता मात्रेवर 0.05 स्तरावर सार्थक आहे. त्यामुळे शून्य परिकल्पना त्याज्य ठरते. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पना स्विकारण्यात आली आहे. याचाच अर्थ, 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या व्यावसायिक ताणात कोणताही फरक आढळून येत नाही' या शून्य परीकाल्पनेचा त्याग करून 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून येतो' या संशोधन परीकाल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. सदर फरक हा खरा व वैध असून तो विश्वसनीय आहे. यावरून संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून येतो. असा संशोधन अभ्यासाअंती निष्कर्ष निघतो.

4. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे प्राप्त टी मूल्य 11.51 हे 212 स्वाधीनता मात्रेवर 0.05 स्तरावर सार्थक आहे. त्यामुळे शून्य परिकल्पना त्याज्य ठरते. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पना स्विकारण्यात आली आहे. याचाच अर्थ, 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताणात कोणताही फरक आढळून येत नाही' या शून्य परीकाल्पनेचा त्याग करून 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून येतो' या संशोधन परीकल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. सदर फरक हा खरा व वैध असून तो विश्वसनीय आहे. यावरून संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला व पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताणात लक्षणीय फरक आढळून

येतो. असा संशोधन अभ्यासाअंती निष्कर्ष निघतो.

5. संशोधकाने केलेल्या तुलनात्मक अभ्यासाचे प्राप्त सहसंबंध गुणक (r) 0.84 आहे. सदर प्राप्त सहसंबंध गुणक कार्ल पिअर्सन यांच्या गृहीत मध्यमान सहसंबंध गुणक पद्धतीच्या प्रमाणित श्रेणीनुसार (0.75 ते 1.0 - उच्च प्रतीचा धनात्मक) उच्च प्रतीचा धनात्मक आहे. त्यामुळे शून्य परिकल्पना त्याज्य ठरते. त्यामुळे शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पना स्विकारण्यात आली आहे. याचाच अर्थ, 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यात सहसंबंध आढळून येत नाही' या शून्य परीकाल्पनेचा त्याग करून 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यात सहसंबंध आढळून येतो' या संशोधन परीकाल्पनेचा स्वीकार करण्यात आला आहे. सदर फरक हा खरा व वैध असून तो विश्वसनीय आहे. यावरून संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान आणि व्यावसायिक ताण यात उच्च प्रतीचा धनात्मक सहसंबंध आढळून येतो. असा संशोधन अभ्यासाअंती निष्कर्ष निघतो.

21. संशोधनाचे मुख्य निष्कर्ष

1. महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यशैलीमध्ये अंतर असते. त्यांचे व्यावसायिक, सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदारी आणि कर्तव्ये यातही फरक असतो. याचा परिणाम त्यांच्या कार्यसमाधानावर होणे स्वाभाविक आहे.
2. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यसमाधान मापनश्रेणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता प्राप्त 't' मूल्य 2.91 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.
3. महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्य करण्याच्या पद्धतीमध्ये अंतर असते. महिला आणि पुरुष यांची कामे कौशल्यानुसार वाटली गेलेली असतात. जी कामे महिला करतात ती कामे पुरुष करत नाहीत आणि जी कामे परुष करतात ती कामे महिला करत नाहीत. मेहनतीची कामे जास्ती करून पुरुषांना दिली जातात तर महिलांना कौशल्याची कामे दिली जातात. याचा परिणाम परिणाम त्यांच्या कार्यसमाधानावर होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधानात फरक आहे.

4. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान मापनश्रेणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता प्राप्त 't' मूल्य 8.79 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यसमाधानात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.
5. पुरुष शिक्षकांवर सामाजिक जबाबदारी जास्त असते. ते आर्थिक स्त्रोतावर अधिक केंद्रित असतात. मात्र महिला शिक्षकांपेक्षा त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदारीचे प्रमाण कमी असते. यामुळे महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात फरक निर्माण होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात फरक आहे.
6. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता प्राप्त 't' मूल्य 8.40 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या ताणात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.
7. पुरुष शिक्षकेतर कर्मचारी हे शाळेतील कामे करतात मात्र इतर घरातील कामे करण्याची गरज नसते. घरातील महिला ती कामे करून घेतात. यामुळे त्यांना थोडा वेळ मिळतो. मात्र महिला शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसाही वेळ मिळत नाही. त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणे स्वाभाविक आहे. यामुळे महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात तफावत निर्माण होणे स्वाभाविक आहे. संशोधन अभ्यासातून दिसून आले आहे कि महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात फरक आहे.
8. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणाआधारे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील महिला आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व्यावसायिक ताण निर्देशांक चाचणीतील प्राप्तांकांची तुलना केली असता प्राप्त 't' मूल्य 11.51 असून ते सार्थकता मूल्यापेक्षा (2.576) अधिक आहे. म्हणून संशोधकाने शून्य परिकल्पनेचा त्याग करून संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. अर्थातच कस्तुरबा गांधी विद्यालयातील महिला

आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात लक्षणीय फरक असतो असा संशोधनाअंती निष्कर्ष निघतो.

9. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कार्यसमाधान आणि ताण यात धनात्मक सहसंबंध आहे. कर्मचाऱ्यांना जर व्यावसायिक ताण कमी असेल तर त्यांचे कार्यसमाधान वाढते. कर्मचारी मानसिक दृष्ट्या संतुलित आणि सक्षम असतील तर ते अधिक चांगल्या पद्धतीने आणि समर्पित वृत्तीने कार्य करतात.
10. संशोधनातील सांख्यिकीय विश्लेषणावरून कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यातील सहसंबंध गुणांक 0.84 आहे. याचाच अर्थ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान व व्यावसायिक ताण यांच्यामध्ये उच्च प्रतीचा धनात्मक सहसंबंध दिसून येतो.

22. संशोधन निष्कर्षांची चर्चा

प्रस्तुत संशोधनात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी य यांच्या कार्यसमाधान आणि ताण यांचा तुलनात्मक अभ्यास केला गेला आहे. यातून असे दिसून आले आहे कि महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक यांच्या कार्यसमाधानात फरक असतो. सदर फरक असणे स्वाभाविक आहे कारण महिला आणि पुरुष यांची कार्यशैली आणि जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात. याचा परिणाम त्यांच्या जीवनशैलीवर होतो आणि जीवनशैलीचा परिणाम त्यांच्या कार्यावर होतो. त्याचप्रमाणे महिला शिक्षकेतर कर्मचारी आणि पुरुष शिक्षक कर्मचारी यांच्या कार्यसमाधानातही फरक दिसून आला आहे. याचार अर्थ महिला आणि पुरुष यांच्या सामाजिक आणि कौटुंबिक तसेच शैक्षणिक जबाबदारीचा प्रभाव त्यांच्या कार्यसमाधानावर होतो असे दिसून आले आहे.

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे कार्यासामाधन वाढणे अपेक्षित असेल तर त्यासाठी काही उपाययोजना केल्या जाणे आवश्यक आहे. त्यांची कौशल्ये आणि ज्ञान वाढविण्यासाठी प्रशिक्षण आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. त्यांच्यासाठी खुले धोरण जोपासावे यामुळे कर्मचाऱ्यांना चिंता आणि सूचना सामायिक करण्यासाठी प्रोत्साहित करता येणे शक्य होईल. त्याचबरोबर त्यांच्यासाठी शालेय प्रशासनाने शैक्षणिक जबाबदारीचे धोरण लवचिक ठेवावे तसेच रजा धोरणांद्वारे कार्य-जीवन संतुलनास प्रोत्साहन द्यावे. यामुळे त्यांना कार्य करण्यामध्ये रस वाटेल आणि ते आपले नियोजित कार्य अधिक सक्षमतेने आणि प्रभावीपणे करतील. कारण जर कार्यसमाधान चांगले असेल तर ते अधिक चांगले कार्य करतील. कारण संशोधन निष्कर्षातून हे सिद्ध झाले आहे की महिला आणि पुरुष

कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधानात तफावत आहे. हा फरक कमीत कमी अथवा नाहिसा होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षावरून सिद्ध झाले आहे कि महिला शिक्षक आणि पुरुष शिक्षक तसेच महिला शिक्षकेतर कर्मचारी आणि पुरुष शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ताणात फरक आहे. महिला आणि पुरुष यांची कामे वेगवेगळी असतात. जबाबदारीची भिन्नता आणि इतर सामाजिक प्रभाव याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होत असतो. याचबरोबर सेवा सुरक्षितता, शाळेचे वातावरण, प्रशासनाची भूमिका, कामाचे तास, रजा प्रणाली, अतिरिक्त कार्यभार असे अनेक घटकांमुळे ताण वाढत जातो. शालेय स्तरावर कर्मचाऱ्यांना व्यावसायिक ताण कमी होण्यासाठी उपयोजना करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांचे कार्यसमाधान आणि ताण यांचा सहसंबंध तपासला असता त्यात उच्च प्रतीचा धनात्मक सहसंबंध आढळून आला आहे. याचाच अर्थ कर्मचाऱ्यांचा ताण हा त्यांच्या कार्यसमाधानावर परिणाम करत असतो.

23. संशोधनाच्या शिफारशी

1. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे नोकरीतील कार्यसमाधान आणि तणाव पातळीचे निरीक्षण करण्यासाठी नियमित सर्वेक्षण करण्याची व्यवस्था निर्माण करावी.
2. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे तणाव आणि असंतोषाची मूळ कारणांचा शोध घेऊन त्यासाठी सकारात्मक प्रयत्न होणे गरजेचे आहे.
3. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची कौशल्ये आणि ज्ञान वाढविण्यासाठी प्रशिक्षण आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
4. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी खुले धोरण जोपासावे यामुळे कर्मचाऱ्यांना चिंता आणि सूचना सामायिक करण्यासाठी प्रोत्साहित करता येणे शक्य होईल.
5. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात यावे. यामुळे ते आपल्या कामाविषयी अधिक सकारात्मक आणि प्रोत्साहित होतील.
6. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी शालेय प्रशासनाने शैक्षणिक जबाबदारीचे धोरण लवचिक ठेवावे तसेच रजा धोरणांद्वारे कार्य-जीवन संतुलनास प्रोत्साहन द्यावे.

7. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मानसिक आरोग्य स्वस्थ राहावे शालेय प्रशासनाने विशिष्ट उपक्रम राबवावेत.
8. शालेय प्रशासनाने कर्मचाऱ्यांमध्ये समूहकार्य आणि सहयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना प्रेरित करावे.
9. शालेय प्रशासनाने वेळोवेळी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या अडचणी आणि गरजा समजून घेऊन त्यांना सहकार्य करावे.
10. शालेय प्रशासनाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्कलोड आणि जबाबदाऱ्या व्यवस्थापित करण्यासाठी कर्मचाऱ्यांना संसाधने आणि समर्थन उपलब्ध करून द्यावे.

24. पुढील संशोधनासाठी विषय

1. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांमध्ये नोकरीतील समाधान आणि तणावावर प्रभाव टाकण्यात नेतृत्व शैलीची भूमिका अभ्यासणे.
2. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये नोकरीतील समाधान आणि तणावावरील संघटनात्मक संस्कृतीच्या परिणामाचा अभ्यास करणे.
3. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक-विद्यार्थी नात्याचा नोकरीतील समाधान आणि तणावावरील परिणाम अभ्यासणे.
4. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये नोकरीतील समाधान आणि तणावाचे व्यवस्थापन करण्यात भावनिक बुद्धिमत्तेची भूमिका.
5. शहरी आणि ग्रामीण शाळांमधील शिक्षकांमधील नोकरीतील समाधान आणि तणाव यांच्यातील संबंध शोधणे.

25. समारोप

प्रस्तुत संशोधनकार्यात महाराष्ट्रातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्यसमाधान आणि ताण यांचा सहसंबंधात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये सदर अभ्यासासाठी प्रमाणित चाचणीच्या माध्यमाने संकलित केलेल्या माहितीचे संखीकीय विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. यामध्ये उद्दिष्टनिहाय निष्कर्ष, संशोधनाचे मुख्य निष्कर्ष आणि परिकल्पना पडताळणी आधारित निष्कर्ष काढण्यात आले आहेत. याचबरोबर प्राप्त निष्कर्षांवर चर्चा करण्यात आली आहे. संशोधनातील प्राप्त निष्कर्षांच्या आधारावर शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आले आहेत.

26. संदर्भ सूची

1. आहेर हिरा, (2010), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, दत्तसन्स पब्लिशर्स, नागपूर

2. करंदीकर सुरेश, (2003), शिक्षण आणि भारतीय समाज, फडके प्रकाशन, कोल्हापूर
3. कळके, शिरगावे, शेंडगे, (2003), अध्ययनार्थी चे मानसशास्त्र आणि अध्ययन प्रक्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर
4. करंदीकर सुरेश (2003) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर
5. कऱ्हाडे बी. एम., (2007), शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे प्रकाशन: नागपूर
6. खरात आप्पा (1988) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे
7. गुप्ते, उल्हास, (2014), सुबोध संख्याशास्त्र, ढवळे प्रकाशन, पुणे
8. घोरमोडे के. यु., घोरमोडे कला, (2008), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन: नागपूर
9. श्रायनर ख्रिश्चन (2013) तणावमुक्त जगण्यासाठी,रोहण प्रकाशन, मुंबई
10. चव्हाण दिपक, मुळे संदिप, (2013), शैक्षणिक संशोधनाचा आरखडा, इनसाईट पब्लिकेशन, नाशिक
11. चित्ते हेमंत, (2015), शैक्षणिक संशोधन:मांडणी व दिशा, सात्विक प्रकाशन, नाशिक
12. जगताप ह. ना., (2010), शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
13. जगताप ह. ना., (1997) शैक्षणिक मानसशास्त्र, अनमोल प्रकाशन, पुणे
14. जोशी विनय, (2010), ताण, डायमंड पब्लिकेशन, पुणे
15. दांडेकर, वा. ना., (1992),शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे
16. डेव्हिड सिल्वरमन (संपादक), (2019), गुणात्मक संशोधन, सेज पब्लिकेशन: नवी दिल्ली
17. ढोके, ग. बा., (2016), शैक्षणिक संख्याशास्त्र, नाथे पब्लिकेशन, लातूर
18. नानकर प्र. ल., शिरोडे संगीता (2009) वर्तमान शिक्षणतील विचारप्रवाह, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
19. पंडित संजय, (2013) मनाचे व्यवस्थापन, ध्रुव मीडिया पब्लिकेशन, मुंबई
20. पाटील विनोद, (2010), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक आणि शिक्षण, इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक
21. पाटील लीला, (2007), आजचे शिक्षण:आजच्या समस्या, पुणे, श्री विदया प्रकाशन
22. भारंबे, इंदुमती, (2011), शैक्षणिक संख्याशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
23. शार्लीन हेस-बिबर, (2017), गुणात्मक संशोधनाची कार्यपद्धती, सेज पब्लिकेशन: नवी दिल्ली,

24. Aggarwal S. K., (2019), Educational Research: Methods and Techniques, Vikas Publishing House, New Delhi
25. Bhalla V. K., (2020), Educational Research: A Comprehensive Guide, Chand Publishing, New Delhi
26. Chaudhary S. S., 2019, Educational Research: A Student's Guide, Anmol Publications, New Delhi
27. Gupta S. P., (2019), Research in Education: A Practical Approach, Rawat Publications, Jaipur.
28. Mangal S. K., (2019), Research Methodology in Education: A Practical Approach, PHI Learning, New Delhi
29. Afshar, H. S., & Doosti, M., (2016), investigating the impact of job satisfaction/dissatisfaction on Iranian English teachers" job performance. Iranian Journal of Language Teaching Research, 4 (1), 97- 115.
30. Behera, D., (2014), Relationship between job satisfaction and mental health of mainstream school teachers in West Bengal. IJSR International Journal of Scientific Research, 3 (8), 79-84.
31. Biswas, R. A., (2016), Emotional Intelligence and Job Satisfaction of Teacher: An Analysis. The International Journal of Humanities & Social Studies, 4 (5), 118-122
32. Dachen, J., (2017), Comparative study of occupational stress among physical education teachers of Jammu and Kashmir. International Journal of Physical Education, 10 (1&2), 19-22.
33. Emoja, M. M., (2016), Job satisfaction and teacher turnover intention in secondary schools in kaka mega central district, Kenya. International Journal of Education and Research, 4 (3), 85-100
34. Malik, U., & Anju, (2015), A study of occupational stress among secondary school teachers in relation to their self-efficacy, Indian Journal of Applied Research, 5 (12), 429-431.

संशोधक
नूतन भगवान मघाडे

संशोधन मार्गदर्शक
डॉ. अमरदीप पी. आसोलकर